Government of Bombay
Legal Department

Bombay Act No. XXIII of 1945

The Bombay Beggars Act, 1945

[As modified up to the 1st November 1952]

मुंबई सरकार
लीगल डिपार्टमेंट

सन १९४५ चा मुंबईचा आक्ट नंबर २३ वा

सन १९४५ चा मुंबईचा भिकाऱ्यांबाबत आक्ट

(तारीख १ माहे नोव्हेंबर सन १९५२ पावेतों सुधारलेला)

BOMBAY
PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS

... the Government Publications Sales Depot, Institute of Science ... Bombay (for purchasers in Bombay City), from the Government ... rni Road Gardens, Bombay 4 (for orders from the mofussil) or ... Commissioner for India, India House, Aldwych, London, W.C.2, ... recognized Bookseller.

[*Price*—Rs. 2 As. 7]

1953

सन १९४९ चा मुंबईचा भिकाऱ्यांबाबत आक्ट.

3532

अनुक्रमणिका.

उद्देश.
कलमें. पृष्ठ.

बाब १ ली.

प्रारंभीचे ठराव.

बाब २ री.

भिकारी व अपराधी भिकारी यांची व्यवस्था लावण्याबाबत काम चालविण्याची रीत.

बाब ३ री.

दाखल करून घेण्याचीं ठिकाणें व दाखला दिलेल्या संस्था.

बाब ४ थी.

किरकोळ.

BOMBAY ACT No. XXIII OF 1945.

[THE BEGGARS ACT, 1945].

[20th February 1946.]

सन १९४५ चा मुंबईचा आक्ट २३ वा.

[सन १९४५ चा मुंबईचा भिकाऱ्यांबाबत आक्ट.]

[२० फेब्रुवारी १९४६.]

सन १९४७ चा मुंबईचा आक्ट ५३ वा यावरून सुधारलेला.

सन १९५० चा ॲडॅप्टेशन ऑफ् लॉज् ऑर्डर यावरून जुळता करून घेतलेला व फेरफार केलेला.

सन १९५२ चा मुंबईचा आक्ट ११ चा यावरून सुधारलेला.

मुंबई प्रांतांत भीक मागण्यास प्रतिबंध करणें, भिकारी व त्यांच्यावर अवलंबून असलेले इसम यांस दाखला दिलेल्या संस्थांत अटकावून ठेवणें, ट्रेनिंग देणें, व कामावर लावणें आणि अपराधी भिकाऱ्यांस रखवालींत ठेवणें, त्यांचा इन्साफ करणें व त्यांस शिक्षा देणें यांची तरतूद करण्याबाबत आक्ट.

ज्याअर्थी, मुंबई प्रांतांत भीक मागण्यास प्रतिबंध करणें, भिकारी व त्यांच्यावर अवलंबून असलेले इसम यांस दाखला दिलेल्या संस्थांत अटकावून ठेवणें, ट्रेनिंग देणें व कामावर लावणें, आणि अपराधी भिकाऱ्यांस रखवालींत ठेवणें, त्यांचा इन्साफ करणें व त्यांस शिक्षा देणें यांची तरतूद करण्याबाबत आक्ट करणें इष्ट आहे ;

आणि ज्याअर्थी, मुंबईचे गव्हर्नर यांनीं, सन १९३५ चा हिंदुस्थान सरकारसंबंधीं आक्ट याच्या ९३ व्या कलमाअन्वयें त्यांनीं काढलेल्या तारीख ४ माहे नोव्हेंबर सन १९३९ रोजींच्या जाहीरनाम्याअन्वयें सदरहू आक्टावरून किंवा आक्टाअन्वयें प्रांतिक कायदेमंडळाकडे असलेले सर्व अधिकार आपण स्वत: धारण केले आहेत ;

त्याअर्थी, आतां, सदरहू अधिकार चालवून मुंबईचे गव्हर्नर हे पुढील आक्ट करीत आहेत :—

बाब १ ली.

प्रारंभींचे ठराव.

१. (१) या आक्टास सन १९४५ चा मुंबईचा भिकाऱ्यांबाबत आक्ट, असें म्हणावें. लहान सरनामा, व्याप्ति व सुरुवात.

१ सन १९४७ चा मुंबईचा आक्ट ५३ वा, कलम २ याअन्वयें हा आक्ट रद्द करण्यांत आला व त्याला पुन्हा कायद्याचें स्वरूप देण्यांत आलें.

(२) तो सबंध मुंबई [1][राज्यास] लागू आहे ; परंतु तो [2][राज्य] सरकार सरकारी गॅझेटांत जाहीरनामा प्रसिद्ध करून कोणत्याहि प्रदेशाच्या संबंधांत याबाबत जी तारीख ठरवील त्या तारखेस त्या प्रदेशांत अंमलांत येईल.

व्याख्या. २. या आक्टांत विषयास अगर संदर्भास कांहीं बाध येत नसेल तर—

(१) "भीक मागणें" म्हणजे—

(अ) सार्वजनिक जागेंत भिक्षा मागणें अथवा घेणें, मग ती गाणें, नाचणें, भविष्य सांगणें, करामतीची कामें करून दाखविणें किंवा वस्तु विकणें यांच्या मिषानें असो वा नसो ;

(ब) भिक्षा मागण्यासाठीं किंवा घेण्यासाठीं कोणत्याहि खाजगी जागेंत प्रवेश करणें ;

(क) भिक्षा मिळविण्याच्या किंवा काढण्याच्या उद्देशानें [3][मनुष्य प्राण्याचें किंवा जनावराचें] कोणतेंहि क्षत, जखम, दुखापत, अंगविकृति अथवा रोग उघडा करणें किंवा दाखविणें.

(ड) उपजीविकेचें कोणतेंहि दृश्य साधन नसणें आणि कोणत्याहि सार्वजनिक जागेंत अशा स्थितींत अगर रितीनें भटकणें किंवा रहाणें कीं ज्यायोगें तसें करणारा इसम हा भिक्षा मागून अथवा घेऊन जगतो असें समजण्यांत येईल ;

(इ) भिक्षा मागण्याच्या किंवा घेण्याच्या कारणासाठीं दाखवावयाची वस्तु म्हणून आपला उपयोग करूं देणें ; परंतु त्यांत पुढील बाबींचा समावेश होणार नाहीं—

(१) मंदीर, मशीद किंवा सार्वजनिक प्रार्थनेची इतर जागा यांत किंवा तिच्या आसपास भिक्षा मागणें किंवा घेणें, अथवा

(२) कोणत्याहि कायद्यावरून अधिकृत ठरविलेल्या अथवा [4][ग्रेटर मुंबईत] पोलीस कमिशनरकडून किंवा इतर ठिकाणीं डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट-कडून अथवा [2][राज्य] सरकारकडून ठरविलेल्या रीतीनें अधिकृत ठरविलेल्या कारणासाठीं पैसा किंवा अन्न किंवा देणग्या मागणें किंवा घेणे :

मात्र असें ठरविण्यांत येत आहे कीं, कोणतेंहि मंदीर, मशीद किंवा सार्वजनिक प्रार्थनेची इतर कोणतीहि जागा यांच्या ट्रस्टीकडून अर्ज

---

१ सन १९५० चा अॅडॅप्टेशन ऑफ् लॉज् ऑर्डर याअन्वयें "प्रांतिक" ह्या शब्दाच्या बदला हा शब्द दाखल करण्यांत आला.

२ वरील ऑर्डर अन्वयेंच "प्रांतिक" ह्या शब्दाच्या बदला हा शब्द दाखल करण्यांत आला.

३ सन १९४७ चा मुंबईचा आक्ट ५३ वा याचें कलम २ (१) (अ) या अन्वयें हे शब्द जादा दाखल करण्यांत आले.

४ सन १९४७ चा मुंबईचा आक्ट ५३ वा याचें कलम २ (१) (ब) यावरून "मुंबई शहरांत" ह्या शब्दांच्या बदला हे शब्द दाखल करण्यांत आले.

आला असतां, [१][राज्य] सरकारास, जाहीरनामा काढून किंवा ठरविलेल्या रीतीनें, असें फर्मावण्याचा अधिकार आहे कीं, "भीक मागणें" या संज्ञेत, अशा मंदीरांत, मशिदींत किंवा सार्वजनिक प्रार्थनेच्या इतर जागेंत किंवा तिच्या आसपास भिक्षा मागण्याचा किंवा घेण्याचा समावेश होईल.

(२) "दाखला दिलेली संस्था" या संज्ञेचा अर्थ, भिकारी व त्यांच्यावर अवलंबून असलेले इसम यांस अटकावून ठेवण्यासाठीं, ट्रेनिंग देण्यासाठीं व कामावर लावण्यासाठीं [१][राज्य] सरकारनें काढलेली व चालवलेली कोणतीहि संस्था असा समजावा आणि तींत कलम ११, पोट-कलम (१) अन्वयें अशी संस्था म्हणून दाखला दिलेल्या संस्थेचा समावेश होतो ;

(३) "चीफ् इन्स्पेक्टर" या संज्ञेचा अर्थ, कलम १५, पोट-कलम (१) अन्वयें नेमलेला दाखला दिलेल्या संस्थांचा "चीफ् इन्स्पेक्टर" असा समजावा.

(४) "मूल" संज्ञेचा [२]सन १९२४ चा मुंबईचा मुलांबाबत आक्ट यांत जो अर्थ दिला आहे तोच अर्थ असेल.

[३][(४-अ) 'कोर्ट' या संज्ञेचा अर्थ, ग्रेटर मुंबईत पगारी प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रे-टाचें कोर्ट व इतर ठिकाणीं पहिल्या वर्गाच्या मॅजिस्ट्रेटाचें कोर्ट, असा समजावा;]

(५) "जुव्हेनाईल कोर्ट" या संज्ञेचा [२]सन १९२४ चा मुलांबाबत आक्ट, यांत जो अर्थ दिला आहे तोच अर्थ असेल.

(६) [४]* * * * * * * *

(७) "ठरविलेलें" या संज्ञेचा अर्थ, या आक्टाअन्वयें केलेल्या कानूंवरून ठरविलेलें असा समजावा.

(८) "सार्वजनिक जागा" या संज्ञेंत रेल्वे ट्रेनचा समावेश होतो.

(९) "दाखल करून घेण्याचें ठिकाण" या संज्ञेचा अर्थ, भिकारी दाखल करून घेऊन त्यांस तात्पुरतें अटकावून ठेवण्यासाठीं [१][राज्य] सरकारनें ठरविलेली संस्था अथवा अशी संस्था म्हणून कलम १०, पोट-कलम (१) अन्वयें दाखला दिलेली संस्था असा समजावा.

(१०) "ट्रस्टी" या संज्ञेचा अर्थ, मंदिर, मशीद अथवा सार्वजनिक प्रार्थनेची इतर जागा यांचा कारभार, त्या त्या वेळीं अंमलांत असलेल्या कोणत्याहि

---

१ सन १९५० चा ॲडॅप्टेशन ऑफ् लॉज् ऑर्डर याअन्वयें "प्रांतिक" ह्या शब्दाच्या बदला हा शब्द दाखल करण्यांत आला.

२ आतां सन १९४८ चा मुलांबाबत आक्ट (सन १९४८ चा मुंबईचा आक्ट ७१ वा) पहा.

३ सन १९४७ चा मुंबईचा आक्ट ५३ वा याचें कलम २ (१) (क) अन्वयें ही रकम दाखल करण्यांत आली.

वरील आक्टाचें कलम २ (१) (ड) अन्वये ही रकम गाळण्यांत आलीं.

कायद्यानुसार अथवा ट्रस्टाच्या लेखांतील शर्तीनुसार अथवा अशा मंदिराच्या, मशिदीच्या अथवा सार्वजनिक प्रार्थनेच्या इतर जागेच्या संबंधांत योग्य हुकुमतीच्या कोर्टाच्या हुकूमनाम्याच्या किंवा हुकुमाच्या शर्तीनुसार, ज्याच्याकडे सोंपविला असेल असा इसम मग तो कोणत्याहि नांवानें ओळखला जात असो, अथवा जर असा कोणीहि इसम नसेल तर, या कलमाच्या (१) ल्या रकमेची पोट-रकम (इ) (२) हिच्या विशेष ठरावांत उल्लेख केलेल्या अर्जाच्या तारखेच्या लगत पूर्वीच्या एक वर्षाच्या मुदतींत तें मंदीर, मशीद अगर प्रार्थनेची इतर जागा यांचा कारभार ज्यानें चालविला असेल, व जणूं ट्रस्टी असल्याप्रमाणें जो जबाबदार असेल असा कोणीहि इसम, आणि जर असे ट्रस्टी एकापेक्षां अधिक असतील तर बहुसंख्य ट्रस्टी, असा समजावा.

बाब २ री.

भिकारी व अपराधी भिकारी यांची व्यवस्था लावण्याबाबत काम चालविण्याची रीत.

कोर्टांचे अधिकार.

३. या आक्टावरून कोर्टांस दिलेले अधिकार हे, फक्त हायकोर्ट, सेशन कोर्ट, पगारी प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट, पहिल्या वर्गाचा मॅजिस्ट्रेट अथवा जुव्हेनाईल कोर्ट यानींच चालविले पाहिजेत आणि अशाच कोर्टांना ते चालविण्याचा अधिकार आहे, मग ती केस त्यांच्यापुढें सुरवातीस आलेली असो अथवा अपिलांत किंवा फेरतपासणीकरितां आलेली असो.

भीक मागतांना आढळलेल्या इसमास कोर्टापुढें हजर राहण्यास फर्माविण्याचा अधिकार.

४. (१) कोणत्याहि पोलिस अंमलदारास अथवा [१][राज्य] सरकारनें केलेल्या कानूंप्रमाणें याबाबत अधिकार मिळालेल्या इतर इसमास, भीक मागतांना आढळून आलेल्या कोणाहि इसमास वारंटाशिवाय धरण्याचा अधिकार आहे :

मात्र असें ठरविण्यांत येत आहे कीं, भिक्षा मागण्यासाठीं किंवा घेण्यासाठीं कोणत्याहि खाजगी जागेंत प्रवेश करणाऱ्या कोणत्याहि इसमास, सदरहू जागेच्या [२]* * * * भोगवटा करणारानें तक्रार केल्यावांचून अशा रीतीनें धरण्यांत येतां कामा नये अथवा तो या आक्टाअन्वयें कोणतेंहि कायद्याचें काम चालविलें जाण्यास पात्र असणार नाहीं.

(२) अशा पोलीस अंमलदारानें किंवा इतर इसमानें, अशा रीतीनें धरलेल्या इसमास कोर्टांत नेलें किंवा पाठविलें पाहिजे.

---

१ सन १९५० चा अॅडॅप्टेशन ऑफ् लॉज् ऑर्डर याअन्वयें "प्रांतिक" ह्या शब्दाच्या बदला हा शब्द दाखल करण्यांत आला.

२ सन १९४७ चा मुंबईचा आक्ट ५३ वा याचें कलम २ (२) याअन्वयें "मालकानें किंवा" हे शब्द गाळण्यांत आले.

(३) प्रसंगाप्रमाणें, सन १८९८ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयीं कायदा याच्या ६१ व्या कलमाचे, किंवा सन १९०२ चा मुंबईचा शहरच्या पोलिसांबाबत आक्ट याच्या ८७ व्या कलमाचे ठराव, या कलमाअन्वयें धरलेल्या प्रत्येक इसमास लागू असतील, आणि पोलिस-स्टेशन किंवा सेक्शन स्वाधीन असलेल्या अंमलदारानें, धरलेल्या इसमास कोर्टापुढें हजर करण्यांत येईपर्यंत ठरविलेल्या रीतीनें ठेवण्याची व्यवस्था करविली पाहिजे.

भीक मागतांना आढळलेल्या इसमांच्या संबंधांत संक्षिप्त चौकशी व त्यांना अटकावून ठेवण्याबाबत.

५. (१) जेव्हां कलम ४ अन्वयें कोर्टापुढें हजर केलेल्या इसमास, या आक्टाअन्वयें दाखला दिलेल्या संस्थेंत पूर्वी अटकावून ठेविलें असल्याचें शाबित होणार नाहीं तेव्हां, कोर्टानें, तो भीक मागतांना आढळून आला होता अशा आरोपाबद्दल, ठरविलेल्या रीतीनें संक्षिप्त चौकशी केली पाहिजे.

(२) जर पोट-कलम (१) मध्यें उल्लेख केलेली चौकशी तावडतोब पुरी करतां येत नसेल तर, कोर्टास तें (चौकशीचें काम) वेळोवेळीं तहकूब ठेवण्याचा आणि त्या इसमास सोइस्कर असेल अशा जागेंत व रखवालींत ठेवण्याबद्दल हुकूम करण्याचा अधिकार आहे.

(३) जेव्हां पोट-कलम (१) मध्यें उल्लेख केलेली चौकशी केल्यावर, सदरहू इसम भीक मागतांना आढळून आला अशी कोर्टाची खात्री झाली नाहीं, तर अशा इसमास तावडतोब सोडून द्यावें असा हुकूम कोर्ट करील.

(४) पोट-कलम (१) मध्यें उल्लेख केलेली चौकशी केल्यावर, असा इसम भीक मागतांना आढळून आला अशी कोर्टाची खात्री झाल्यास, कोर्ट सदरहू इसम भिकारी आहे असा इकरार दप्तरदाखल नमूद करील.

[१]*   *   *   *

(५) पोट-कलम (४) अन्वयें भिकारी म्हणून जाहीर केलेल्या इसमास एक वर्षाहून कमी नाहीं व तीन वर्षांहून अधिक नाहीं इतक्या मुदतीपर्यंत दाखला दिलेल्या संस्थेंत अटकावून ठेवण्याबद्दल कोर्ट हुकूम करील :

मात्र असें ठरविण्यांत येत आहे कीं, जर सदरहू प्रकरणाच्या परिस्थितीवरून कोर्टाची अशी खात्री होईल कीं, कलम (४) अन्वयें भिकारी म्हणून जाहीर केलेला इसम हा पुन्हा भीक मागण्याचा संभव नाहीं तर, सदरहू भिकाऱ्याकडून किंवा कोर्टास योग्य वाटेल अशा इसमाकडून, सदरहू भिकारी भीक मागणार नाहीं व चांगली वर्तणूक ठेवील अशा अर्थाचा मुचलका कोर्ट फर्मावील त्याप्रमाणें,

---

१ सन १९५२ चा मुंबईचा आक्ट २१ वा याचें कलम २ याअन्वयें "कोर्ट कलम २३ च्या" या शब्दांनीं सुरू होणारा व "हुकूम करील" या शब्दांनीं संपणारा मजकूर गाळण्यांत आला.

जामिनासह किंवा जामिनावांचून, घेऊन व योग्य ती ताकीद देऊन, सदरहू भिकाऱ्यास सोडून देण्याचा कोर्टास अधिकार आहे.

(६) पोट-कलम (५) अन्वयें केलेल्या हुकुमाची एक प्रत ताबडतोब चीफ् इन्स्पेक्टरकडे पाठविली पाहिजे.

(८) या कलमांत कोणताहि मजकूर असला तथापि, पोट-कलम (४) अन्वयें भिकारी म्हणून जाहीर केलेला इसम हा जर पांच वर्षे वयाहून कमी नाहीं इतक्या वयाचें मूल असेल तर, कोर्टानें त्यास जुव्हेनाइल कोर्टाकडे पाठवावें, व पोट-कलम (५) अन्वयें कोणताहि हुकूम करतां कामा नये. जुव्हेनाइल कोर्टानें [1]सन १९२४ चा मुंबईचा मुलांबाबत आक्ट याचें कलम ७ अन्वयें त्याची, तें मूल जणूं सदरहू कलमाच्या (१) ल्या पोट-कलमाच्या (ब) रकमेंत वर्णन केल्याप्रमाणें आहे असें समजून व्यवस्था करावी. या पोट-कलमाच्या कारणासाठीं, आवश्यक वाटल्यास, सदरहू भिकाऱ्यास वैद्यकीय अंमलदाराकडून तपासून घेवविण्याचा कोर्टास अधिकार आहे.

भिकारी म्हणून अटकावून ठेवल्यानंतर भीक मागितल्याबद्दल शिक्षा.

६. (१) या आक्टाअन्वयें ज्यास दाखला दिलेल्या संस्थेंत पूर्वी अटकावून ठेवलें होतें असा कोणी इसम भीक मागतांना आढळून आला, तर त्याजवर अपराधाच्या शाबितीचा ठराव झाल्यावर, त्यास या कलमांत यापुढें ठरविल्याप्रमाणें शिक्षा केली जाईल.

(२) जेव्हां एखाद्या इसमावर पोट-कलम (१) अन्वयें अपराधाच्या शाबितीचा ठराव प्रथमच झाला असेल, तेव्हां त्यास तीन वर्षांहून कमी नाहीं व सात वर्षांहून अधिक नाहीं इतक्या मुदतीपर्यंत दाखला दिलेल्या संस्थेंत अटकावून ठेवण्याचा हुकूम कोर्ट करील आणि अशा अटकावून ठेवण्याच्या मुदतीपैकीं एक वर्षांहून अधिक नसलेल्या कोणत्याहि मुदतीचें तितक्याच मुदतीपर्यंतच्या कैदेच्या शिक्षेंत रूपांतर करण्याचा कोर्टास अधिकार आहे.

(३) जेव्हां एखाद्या इसमावर पोट-कलम (१) अन्वयें दुसऱ्यांदा किंवा त्यानंतर अपराधाच्या शाबितीचा ठराव झाला असेल, तेव्हां त्यास दहा वर्षे दाखला दिलेल्या संस्थेंत अटकावून ठेवण्याचा हुकूम कोर्ट करील आणि अशा अटकावून ठेवण्याच्या मुदतीपैकीं दोन वर्षांहून अधिक नाहीं अशा कोणत्याहि मुदतीचें तितक्याच मुदतीपर्यंतच्या कैदेच्या शिक्षेंत रूपांतर करण्याचा कोर्टास अधिकार आहे.

आईबापांनीं रकमा देणें.

[2][६-अ. (१) कोणत्याहि इसमास (ज्यास यांत यापुढें सदरहू इसम असें म्हटलें आहे) कलम ५ किंवा ६ अन्वयें दाखला दिलेल्या संस्थेंत अटकावून

---

१ आतां सन १९४८ चा मुंबईचा मुलांबाबत आक्ट (सन १९४८ चा मुंबईचा ७१ वा) पहा.

२ सन १९५२ चा मुंबईचा आक्ट २१ वा याचें कलम ३ यावरून कलम ६-अ दाखल करण्यांत आलें.

ठेवण्याबद्दल हुकूम करणाऱ्या कोर्टास, आईबापास किंवा सदरहू इसमास पोसण्यास जबाबदार असलेल्या इतर इसमास त्याच्या पोषणासाठीं ठरविलेल्या रीतीनें रकमा देण्याविषयीं, जर तो तसें करण्यास समर्थ असेल तर, हुकूम करण्याचा अधिकार आहे.

(२) पोट-कलम (१) अन्वयें कोणताहि हुकूम करण्यापूर्वी कोर्टानें आईबापाच्या किंवा सदरहू इसमास पोसण्यास जबाबदार असलेल्या इतर इसमाच्या परिस्थिती-संबंधीं चौकशी केली पाहिजे आणि प्रसंगाप्रमाणें, आईबापाच्या किंवा अशा इतर इसमाच्या समक्ष पुरावा नमूद केला पाहिजे.

(३) ह्या कलमाअन्वयें केलेल्या कोणत्याहि हुकुमांत, त्या हुकुमास पात्र असलेल्या पक्षाकडून किंवा इतर रीतीनें कोर्टाकडे अर्ज करण्यांत आल्यावर, बदल करण्याचा कोर्टास अधिकार आहे.

(४) ह्या कलमाअन्वयें केलेला कोणताहि हुकूम, सन १८९८ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतीविषयीं कायदा याच्या ४८८ व्या कलमाअन्वयें केलेला हुकूम ज्या रीतीनें अंमलांत आणण्याचा अधिकार आहे त्याच रीतीनें अंमलांत आणतां येईल.]

७. (१) जेव्हां कलम ५ किंवा ६ अन्वयें कोर्टानें एखाद्या इसमास दाखला दिलेल्या संस्थेंत अटकावून ठेवण्याचा हुकूम केला असेल तेव्हां कोर्टास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, अशा इसमावर सर्वस्वी अवलंबून असेल अशा दुसऱ्या कोणत्याहि इसमाला तितक्याच मुदतीपर्यंत दाखला दिलेल्या संस्थेंत अटकावून ठेवण्याचा हुकूम करण्याचा कोर्टास अधिकार आहे : सर्वस्वी भिकाऱ्यावर अवलंबून असलेल्या इसमांना अटकावून ठेवण्याचा हुकूम करण्याचा कोर्टास अधिकार आहे.

मात्र असें ठरविण्यांत येत आहे कीं, असा हुकूम करण्यापूर्वी, अशा अवलंबून असलेल्या इसमास, असा हुकूम कां करण्यांत येऊं नये याचें कारण दाखविण्याची संधि देण्यांत आली पाहिजे.

(२) अवलंबून असलेला इसम जेव्हां मूल असेल तेव्हां कोर्टानें त्यास जुव्हेनाईल कोर्टाकडे पाठवावें. व जुव्हेनाईल कोर्ट [१]सन १९२४ चा मुंबईचा मुलांबाबत आक्ट याचें कलम ७ अन्वयें त्याची, तें मूल जणूं सदरहू कलमाच्या (१) ल्या पोट-कलमाच्या (अ) रकमेंत वर्णन केल्याप्रमाणें आहे असें समजून, व्यवस्था करावी :

मात्र असें ठरविण्यांत येत आहे कीं, जेव्हां अवलंबून असलेला इसम पांच वर्षे वयाहून कमी वयाचें भिकाऱ्याचें स्वत:चें मूल असेल व भिकारी संसर्गजन्य महारोगानें पीडित नसलेली किंवा वेडी नसलेली अशी धडधाकट आई असेल

---

१ आतां सन १९४८ चा मुंबईचा मुलांबाबत आक्ट (सन १९४८ चा मुंबईचा ७१ वा) पहा.

तेव्हां, सदरहू मुलास तें पांच वर्षांचें होईपर्यंत अटकावून ठेवण्याच्या जागेचे संबंधांत आईपासून वेगळें न करतां दाखला दिलेल्या संस्थेंत अटकावून ठेवण्याचा हुकूम करण्याचा अधिकार आहे. व त्यानंतर या पोट-कलमांत ठरवल्याप्रमाणें त्याची व्यवस्था करतां येईल.

(३) या कलमाच्या कारणाकरितां जरूर तर अवलंबून असलेल्या इसमास अटक करविण्याचा व आपणासमोर आणविण्याचा आणि वैद्यकीय अंमलदाराकडून त्याची तपासणी करविण्याचा कोर्टास अधिकार आहे. प्रसंगा-प्रमाणें, सन १८९८ चा फौजदारी काम चालविण्याच्या रीतींविषयींचा कायदा याच्या ६१ व्या कलमाचे किंवा सन १९०२ चा मुंबई शहरच्या पोलिसांबाबत आक्ट याच्या ८७ व्या कलमाचे ठराव हे, या पोट-कलमाअन्वयें धरलेल्या प्रत्येक इसमाचे बाबतींत लागू असतील, आणि पोलीस स्टेशन किंवा सेक्शन स्वाधीन असलेल्या अंमलदारानें, धरलेला इसम कोर्टापुढें हजर करतां येईतोंपर्यंत ठरविलेल्या रीतीनें त्यास ठेवण्याची व्यवस्था करविली पाहिजे.

असाध्य रोग जडलेल्या असहाय्य भिकाऱ्यांना अधिक मुदतीपर्यंत अटकावून ठेवण्याबाबत हुकूम करण्याचा सरकारचा अधिकार.

८. जेव्हां कलम ५, ६ किंवा ७ अन्वयें दाखला दिलेल्या संस्थेंत अटकावून ठेवण्यांत आलेला कोणताहि इसम हा, त्यानें [१][राज्य] सरकारकडे अर्ज केल्यावरून किंवा अन्यथा आंधळा, पांगळा किंवा इतर रीतीनें असाध्य रोग जडल्यामुळें असहाय्य असल्याचें [१][राज्य] सरकारकडून समजण्यांत येईल, तेव्हां अशा इसमास त्याच्या अटकेची मुदत संपल्यानंतर दाखला दिलेल्या संस्थेंत आणखी बेमुदत अटकावून ठेवण्यांत यावें असा हुकूम करण्याचा [१][राज्य] सरकारास अधिकार आहे :

मात्र असें ठरविण्यांत येत आहे कीं, [१][राज्य] सरकारास योग्य वाटेल असा कोणताहि इसम जर अशा अटकावून ठेवलेल्या इसमाच्या राहण्याची व पालनपोषणाची व त्यास भीक मागूं न देण्याची किंवा भीक मागण्याच्या कारणांसाठीं त्याचा उपयोग केला जाऊं न देण्याची जबाबदारी स्वतःवर घेण्याबाबतचा मुचलका, [१][राज्य] सरकार फर्मावील त्याप्रमाणें जामिनासह किंवा जामिनावांचून करून देईल तर, अशा अटकावून ठेवलेल्या कोणत्याहि इसमास सोडून देण्याचा [१][राज्य] सरकारास अधिकार आहे.

भीक मागण्याकरितां इसम कामावर लावल्याबद्दल

९. जो कोणी इसम कोणाहि इसमास भिक्षा मागण्याच्या किंवा घेण्याच्या कामावर लावील किंवा भीक मागण्यास किंवा घेण्यास लावील, किंवा मुलाची रखवाली, ताबा किंवा काळजी असलेला जो कोणी इसम अशा मुलास भिक्षा मागण्याच्या किंवा घेण्याच्या कामावर लावण्याकडे किंवा मुलास भिक्षा मागण्यास

---

१ सन १९५० चा ॲडॅप्टेशन ऑफ् लॉज् ऑर्डर याअन्वयें "प्रांतिक" ह्या शब्दाच्या बदला हा शब्द दाखल करण्यांत आला.

किंवा घेण्यास लावण्याकडे कानाडोळा करील किंवा तसें करण्यास उत्तेजन देईल आणि जो कोणी इसम दुसऱ्या इसमाचा भीक मागण्याच्या कारणासाठीं दाखविण्याची वस्तु म्हणून उपयोग करील तो, त्याजवर अपराधाच्या शाबितीचा ठराव झाल्यास, पराकाष्ठा एक वर्षाच्या कैदेच्या शिक्षेस आणि त्यानंतर एक वर्षाहून कमी नाहीं व तीन वर्षांहून अधिक नाहीं इतक्या मुदतीपर्यंत दाखला दिलेल्या संस्थेंत अटकावून ठेवण्याच्या किंवा अशा अटकावून ठेवण्याऐवजीं पराकाष्ठा आणखी एक वर्षाच्या कैदेच्या शिक्षेस पात्र असेल. किंवा त्यांना भीक मागण्यास लावल्याबद्दल किंवा भीक मागण्याच्या कारणांसाठीं त्यांचा उपयोग केल्याबद्दल शिक्षा.

वाब ३ री.

दाखल करून घेण्याचीं ठिकाणें व दाखला दिलेल्या संस्था.

१०. (१) [१][राज्य] सरकारास, त्यास योग्य वाटेल अशा एक किंवा अधिक जागीं एक किंवा अधिक दाखल करून घेण्याच्या ठिकाणांची तरतूद करण्याचा व तीं चालू ठेवण्याचा अधिकार आहे अगर कोणत्याहि संस्थेस या आक्टाच्या कारणांसाठीं दाखल करून घेण्याचें ठिकाण म्हणून दाखला देण्याचा अधिकार आहे. दाखल करून घेण्याच्या ठिकाणांची तरतूद.

(२) असें प्रत्येक दाखल करून घेण्याचें ठिकाण, (सदरहू ठिकाण) स्वाधीन असलेल्या अंमलदाराच्या नियंत्रणाखालीं राहील.

११. (१) [१][राज्य] सरकारास, त्यास योग्य वाटेल अशा एक किंवा अधिक ठिकाणीं एका किंवा अधिक दाखला दिलेल्या संस्थांची तरतूद करण्याचा व ती चालविण्याचा किंवा कोणत्याहि संस्थेस या आक्टाच्या कारणांसाठीं, दाखला दिलेली संस्था म्हणून दाखला देण्याचा अधिकार आहे. अशा कोणत्याहि दाखला दिलेल्या संस्थेंत शेतकीविषयक, औद्योगिक व इतर विषयांचें शिक्षण व सर्वसामान्य शिक्षण यांची आणि दाखल केलेल्या इसमांची वैद्यकीय दृष्टया निगा राखण्याची तरतूद करण्याचा अधिकार आहे. दाखला दिलेल्या संस्थांची तरतूद.

(२) अशी दाखला दिलेली प्रत्येक संस्था सुपरिंटेंडंटच्या नियंत्रणाखालीं राहील.

१२. [१][राज्य] सरकार प्रत्येक दाखल करून घेण्याच्या ठिकाणाकरितां व प्रत्येक दाखला दिलेल्या संस्थेकरितां ठरविण्यांत येईल अशा रीतीनें एक व्हिजिटिंग कमिटी (भेट देणारी कमिटी) नेमील. व्हिजिटिंग (भेट देणाऱ्या) कमिटया.

---

१ सन १९५० चा ॲडॅप्टेशन ऑफ् लॉज् ऑर्डर याअन्वयें "प्रांतिक" ह्या शब्दाच्या बदला हा शब्द दाखल करण्यांत आला.

अॅडव्हायजरी कमिटया (सल्लागार कमिटया).

१३. (१) [१][राज्य] सरकारास, कलम १, पोट-कलम (२) अन्वयें हा आक्ट अंमलांत आला असेल अशा कोणत्याहि प्रदेशाकरितां, त्याजकडून नेमण्यांत येतील अशा वीसपेक्षां अधिक नसलेल्या इसमांची एक अॅडवायजरी कमिटी (सल्लागार कमिटी) बनविण्याचा अधिकार आहे :

मात्र असें ठरविण्यांत येत आहे कीं, जेव्हां स्थानिक अधिकाऱ्यानें, त्या स्थानिक अधिकाऱ्याच्या हुकुमतीस पात्र असलेल्या प्रदेशांतील भिकारी ज्यांत अटकावून ठेवण्यांत आले असतील त्या दाखला दिलेल्या संस्था चालविण्याकरितां प्रत्येक बाबतींत [१][राज्य] सरकारास योग्य वाटेल अशी आर्थिक मदत देण्याचें मान्य केलें असेल तेव्हां, [१][राज्य] सरकार अशा प्रदेशांकरितां अॅडवायजरी (सल्लागार) कमिटीवर त्या स्थानिक अधिकाऱ्याचे प्रतिनिधि असलेले असे त्यास योग्य वाटतील तितके इसम नेमील.

(२) कोणत्याहि स्थानिक प्रदेशासाठीं पोट-कलम (१) अन्वयें रचना करण्यांत आलेल्या अॅडवायजरी (सल्लागार) कमिटीस किंवा तिच्या कोणत्याहि सभासदास सर्व योग्य वेळीं व सुपरिंटेंडेंटास योग्य ती नोटीस दिल्यानंतर त्या प्रदेशांतील भिकारी जींत अटकावून ठेवले असतील अशा कोणत्याहि दाखला दिलेल्या संस्थेला भेट देण्याचा अधिकार आहे.

(३) तसेंच अॅडवायजरी कमिटीस—

(१) कोणत्याहि दाखला दिलेल्या संस्थांना चीफ् इन्स्पेक्टरामार्फत किंवा [१][राज्य] सरकारकडून निर्दिष्ट करण्यांत येईल अशा इतर अंमलदारामार्फत व्यवस्थेबाबत सल्ला देण्याचा अधिकार आहे :

(२) स्थानिक प्रदेशांतील किंवा ज्यांत त्या प्रदेशांतील भिकारी अटकावून ठेवण्यांत आले असतील अशा कोणत्याहि किंवा सर्व दाखला दिलेल्या संस्थांचें नित्य त्याचप्रमाणें नैमित्तिक खर्च भागविण्याकरितां वर्गणी गोळा करण्याचा व ती वर्गणी ठरविलेल्या पद्धतीनें खर्च करण्याचा अधिकार आहे ;

(३) चीफ् इन्स्पेक्टरामार्फत त्या स्थानिक प्रदेशांतील कोणत्याहि संस्थेला दाखला दिलेली संस्था म्हणून दाखला देण्यासंबंधीं किंवा कोणत्याहि दाखला दिलेल्या संस्थेचा दाखला काढून घेण्यासंबंधीं [१][राज्य] सरकारास सल्ला देण्याचा अधिकार आहे ;

(४) साधारणपणें सदरहू प्रदेशांतील या आक्टाच्या अंमलबजावणीसंबंधीं व विशेषेंकरून चीफ् इन्स्पेक्टरनें किंवा [१][राज्य] सरकारकडून निर्दिष्ट

---

१ सन १९५० चा अॅडॅप्टेशन ऑफ् लॉज् ऑर्डर याअन्वयें "प्रांतिक" ह्या शब्दाच्या बदला हा शब्द दाखल करण्यांत आला.

करण्यांत आलेल्या कोणत्याहि इतर अंमलदारानें तिजकडे लिहून पाठविलेल्या कोणत्याहि मुद्यासंबंधीं [1][राज्य] सरकारास सल्ला देण्याचा अधिकार आहे.

१४. (१) त्या त्या वेळीं अंमलांत असलेल्या कोणत्याहि कायद्यांत कांहींहि ठराव असला तथापि, दाखला दिलेली संस्था चालविण्याकरितां पैशांच्या विवक्षित रकमेचा भरणा करण्याची कबुली दिली असेल अशा कोणत्याहि स्थानिक अधिकाऱ्यानें त्या रकमेचा भरणा त्याबाबत ठरविलेल्या तारखेच्या पूर्वी [1][राज्य] सरकारकडे केला पाहिजे. स्थानिक अधिकाऱ्यांनीं वर्गणीचा भरणा करणें व तिची वसुली.

(२) जर स्थानिक अधिकाऱ्यानें ठरविलेल्या तारखेच्या पूर्वी पोट-कलम (१) अन्वयें कोणत्याहि रकमेचा भरणा केला नाहीं तर [1][राज्य] सरकारास, त्या त्या वेळीं स्थानिक अधिकाऱ्याचा अंमलदार, खजिनदार, बँकर म्हणून किंवा इतर रीतीनें स्थानिक अधिकाऱ्याच्या वतीनें कोणताहि पैसा ज्याच्या ताब्यांत असेल अशा कोणाहि इसमास त्याच्या हातीं असेल अशा किंवा वेळोवेळीं त्याजकडे येतील अशा पैशांतून सदरहू रकमेचा भरणा [1][राज्य] सरकारकडे करण्यास फर्माविण्याचा अधिकार आहे आणि असा इसम असा हुकूम पाळण्यास बांधलेला आहे.

१५. (१) या अक्टाचे हेतू पार पाडण्याकरितां, दाखला दिलेल्या संस्थांचा चीफ् इन्स्पेक्टर, इन्स्पेक्टर व चीफ् इन्स्पेक्टर यांस मदत करण्याकरितां [1][राज्य] सरकारास आवश्यक वाटतील इतके असिस्टंट इन्स्पेक्टर नेमण्याचा [1][राज्य] सरकारास अधिकार आहे ; आणि चीफ् इन्स्पेक्टरास मदत करण्याकरितां अशा रीतीनें नेमण्यांत आलेल्या अशा प्रत्येक इसमास [1][राज्य] सरकार फर्मावील असे चीफ् इन्स्पेक्टराचे अधिकार व कामें असतील, परंतु त्यानें चीफ् इन्स्पेक्टराच्या हुकुमांस अनुसरून काम केलें पाहिजे. चीफ् इन्स्पेक्टर व असिस्टंट यांची नेमणक.

(२) प्रत्येक दाखल करून घेण्याचें ठिकाण व दाखला दिलेली संस्था यांची तपासणी प्रत्येक सहा महिन्यांतून निदान एक वेळ तरी चीफ् इन्स्पेक्टरनें किंवा इन्स्पेक्टरनें किंवा ॲसिस्टंट इन्स्पेक्टरनें केली पाहिजे.

१६. दाखल करून घेण्याचें ठिकाण स्वाधीन असलेल्या अंमलदारास किंवा दाखला दिलेल्या संस्थेच्या सुपरिंटेंडेंटास असा हुकूम करण्याचा अधिकार आहे कीं, दाखल करून घेण्याच्या ठिकाणीं, किंवा दाखला दिलेल्या संस्थेंत आलेल्या [2][इसमाची झडती घेण्यांत आली पाहिजे, त्या इसमास स्वच्छ करण्यांत आलें पाहिजे], त्याच्या मालकीच्या वस्तु तपासण्यांत आल्या पाहिजेत आणि त्याच्याजवळ किंवा त्याच्या शरिरावर जे कांहीं पैसे किंवा ज्या मूल्यवान् वस्तु आढळतील त्या अशा अंमलदाराच्या किंवा सुपरिंटेंडेंटाच्या रखवालींत दाखल करून घेण्याचीं ठिकाणें व दाखला दिलेल्या संस्था यांत झडती.

---

१ सन १९५० चा ॲडॅप्टेशन ऑफ लॉज् ऑर्डर याअन्वयें "प्रांतिक" ह्या शब्दाच्या बदला हा शब्द दाखल करण्यांत आला.

२ सन १९४७ चा मुंबईचा आक्ट ५३ वा याचें कलम २(४) याअन्वयें मूळ मजकुराच्या बदला हा मजकूर दाखल करण्यांत आला.

ठेवण्यांत आल्या पाहिजेत, आणि पैसे किंवा मूल्यवान वस्तु खेरीजकरून अशा रीतीनें सांपडलेल्या कोणत्याहि वस्तूंची ठरविलेल्या रीतीनें विल्हेवाट लावण्यांत आली पाहिजे. जेव्हां कोर्टानें अशा कोणत्याहि इसमास अटकावून ठेवण्याचा हुकूम केला असेल तेव्हां, प्रसंगाप्रमाणें अशा अंमलदारास किंवा सुपरिंटेंडेंटास [१][अशा इसमाजवळ किंवा त्याच्या शरीरावर आढळलेल्या कोणत्याहि पैशांची किंवा मूल्यवान वस्तूंची ठरविलेल्या रीतीनें विल्हेवाट लावण्यांत यावी] असा हुकूम करण्याचा अधिकार आहे. जेव्हां अशा कोणत्याहि इसमासंबंधीं अटकावून ठेवण्याच्या हुकुमाखेरीज इतर प्रकारचा हुकूम कोर्ट करील तेव्हां, त्याचे पैसे व मूल्यवान वस्तू त्यास परत देण्यांत आल्या पाहिजेत आणि जर त्याचे कपडे नष्ट करण्यांत आले असतील, तर त्यास नवीन कपडे पुरविण्यांत आले पाहिजेत. असे कपडे पुरविण्याचा खर्च [२][राज्य] सरकार करील :

मात्र असें ठरविण्यांत येत आहे कीं, स्त्रीची झडती फक्त स्त्रीकडूनच घेण्यांत येईल व त्यावेळीं योग्य त्या शिष्टसंमत मर्यादा राखण्यांत येतील.

व्यवस्था व शिस्त.

१७. या आक्टाअन्वयें दाखल करून घेण्याचीं ठिकाणें व दाखला दिलेल्या संस्था यांत रिमांड केलेल्या किंवा अटकावून ठेवलेल्या इसमांनीं, व्यवस्था व शिस्त ह्यांबाबत वेळोवेळीं ठरविण्यांत येतील अशा कानू पाळल्या पाहिजेत व त्या कानूंत, अशा कोणत्याहि कानूचा भंग केल्याबद्दल शिक्षेदाखल अंगमेहनतीचें किंवा इतर काम व शिक्षा देणें या गोष्टींचाहि समावेश होईल.

शिस्तभंगाबद्दल कैदेची शिक्षा.

१८. (१) कलम १७ अन्वयें शिस्तभंगाबद्दल करतां येईल अशा कोणत्याहि इलाजास बाध न येतां, कलम १७ मध्यें उल्लेख केलेल्या कोणत्याहि कानूविरुद्ध दाखला दिलेल्या संस्थेंत अटकावून ठेवलेला जो कोणताहि इसम नेहमीं बुद्ध्या वागेल किंवा ती कानू पाळण्यांत हयगय करील त्याचें नांव कोर्टाकडे रिपोर्ट करण्याचा चीफ् इन्स्पेक्टरास अधिकार आहे ; आणि त्यानंतर, सदरहू इसम अशा कोणत्याहि कानूविरुद्ध जाणूनबुजून वागला किंवा ती पाळण्याचे कामीं त्यानें जाणूनबुजून हयगय केली अशी कोर्टाची खात्री झाली तर, दाखला दिलेल्या संस्थेंत त्यास अटकावून ठेवण्याच्या मुदतींपैकीं तीन महिन्यांहून अधिक नाहीं अशा मुदतीचें तितक्याच मुदतीच्या कैदेच्या शिक्षेंत रूपांतर करण्याचा, कोर्टास अधिकार आहे.

(२) पोट-कलम (१) अन्वयें दिलेली कैदेची शिक्षा ही, कलम ६ अन्वयें दिलेली शिक्षा ज्या रीतीनें अंमलांत आणली जाते त्याच रीतीनें अंमलांत आणली जाईल.

---

१ सन १९४७ चा मुंबईचा आक्ट ५३ वा याचें कलम २ (४) (ब) याअन्वयें मूळ मजकुराच्या बदला हा मजकूर दाखल करण्यांत आला.

२ सन १९५० चा अॅडॅप्टेशन ऑफ् लॉज् ऑर्डर या अन्वयें "प्रांतिक" या शब्दाच्या बदला हा शब्द दाखल करण्यांत आला.

१९. (१) ठरविलेल्या शर्तीस पात्र राहून चीफ इन्स्पेक्टरास, एका दाखल करून घेण्याच्या ठिकाणीं किंवा दाखला दिलेल्या संस्थेंत अटकावून ठेवलेल्या कोणत्याहि इसमास तेथून दुसऱ्या दाखल करून घेण्याच्या ठिकाणीं किंवा दाखला दिलेल्या संस्थेंत पाठावण्याविषयीं फर्माविण्याचा अधिकार आहे : एका दाखल करून घेण्याच्या ठिकाणांतून किंवा दाखला दिलेल्या संस्थेंतून दुसऱ्या दाखल करून घेण्याच्या ठिकाणांत किंवा दाखला दिलेल्या संस्थेंत पाठविण्याबाबत.

मात्र असें ठरविण्यांत येत आहे कीं, अशा इसमाच्या अटकावून ठेवण्याची एकंदर मुदत अशा रीतीनें दुसरीकडे पाठविल्यामुळें वाढतां कामा नये.

(२) अशा रीतीनें दुसरीकडे पाठविण्याविषयीं फर्मावितांना चीफ इन्स्पेक्टरानें वैद्यकीय रिपोर्ट व कोर्टानें कलम २९ अन्वयें दिलेल्या कोणत्याहि सूचना यांचा विचार केला पाहिजे.

२०. (१) चीफ इन्स्पेक्टर यास ठरविलेल्या शर्तीस पात्र राहून, दाखला दिलेल्या संस्थेंत अटकावून ठेवलेल्या इसमास अल्प मुदतीकरितां गैरहजर राहण्याची परवानगी कोणत्याहि वेळीं देण्याचा किंवा अशा इसमास लैसेन्स देऊन ठराविक शर्तीवर सोडून देण्याचा अधिकार आहे. लैसेन्सावर सोडून देणें.

(२) पोट-कलम (१) अन्वयें देण्यांत आलेला कोणताहि लैसेन्स, जर तो आधींच रद्द करण्यांत आलेला नसेल तर, सदरहू इसमास ज्या मुदतीपर्यंत दाखला दिलेल्या संस्थेंत अटकावून ठेवण्याविषयीं हुकूम झाला असेल ती मुदत संपेपर्यंत अंमलांत राहील.

(३) असा इसम त्यास या कलमाअन्वयें देण्यांत आलेली परवानगी किंवा देण्यांत आलेला लैसेन्स चालू असण्याच्या मुदतींत दाखला दिलेल्या संस्थेंतून ज्या मुदतींत गैरहजर असेल ती मुदत, त्याची दाखला दिलेल्या संस्थेंत अटकावून ठेवण्याची मुदत मोजण्याच्या कारणासाठीं, त्यास अटकावून ठेवण्याच्या मुदतीचा भाग म्हणून समजण्यांत येईल.

२१. (१) ठरविलेल्या शर्तीस पात्र राहून, चीफ इन्स्पेक्टर यास कोणत्याहि वेळीं कलम २० अन्वयें देण्यांत आलेला लैसेन्स रद्द करण्याचा अधिकार आहे, आणि त्यानंतर सोडून देण्यांत आलेल्या इसमास ज्या मुदतीपर्यंत अटकावून ठेवण्याचा हुकूम झाला असेल ती मुदत संपेपर्यंत दाखला दिलेल्या संस्थेंत अटकावून ठेवण्यांत येईल. लैसेन्स रद्द करणें.

(२) या कलमाच्या कारणासाठीं, चीफ इन्स्पेक्टरास, जरूर तर, सोडून दिलेल्या इसमास अटक करविण्याचा व त्यास अटकावून ठेवण्याबाबतच्या हुकुमाच्या एका प्रतीसह अगदीं नजीकच्या दाखल करून घेण्याच्या ठिकाणीं पाठविण्याचा अधिकार आहे, आणि त्यानंतर कलम २४, पोट-कलम (१) चे ठराव, शक्य असेल तेथवर, लागू होतील.

बिनशर्त सोडून देणें.

२२. कलम २० अन्वयें कोणाहि इसमास लैसेन्सवर सोडून देण्यांत आल्यापासून तीन महिने झाल्यानंतर कोणत्याहि वेळीं, चीफ इन्स्पेक्टरास, असा इसम भीक मागणार नाहीं अशी शक्यता आहे अशी त्याची खात्री झाली तर, त्यास बिनशर्त सोडून देण्याविषयीं [1][राज्य] सरकारास शिफारस करण्याचा अधिकार आहे. [1][राज्य] सरकारास अशा शिफारशीवरून अशा इसमास बिनशर्त सोडून देण्याचा अधिकार आहे, आणि त्यानंतर अशा इसमास ज्या मुदतीपर्यंत दाखला दिलेल्या संस्थेंत अटकावून ठेवण्याचा हुकूम झाला असेल ती मुदत संपली आहे असें समजण्यांत येईल.

बाब ४ थी.

किरकोळ.

(मुंबई राज्यांतील) रहिवासी नसलेल्या भिकाऱ्यांना राज्याबाहेर घालविणें.

२३. [सन १९३२ चा मुंबईचा आक्ट २१ वा, कलम ४ यावरून रद्द केलें.]

अटकावून ठेवण्याचा हुकूम करण्यांत आल्यावर किंवा कैदेची शिक्षा दिल्यावर काम चालविण्याची रीति.

२४. (१) पोट-कलम (२) मधील ठरावांस पात्र राहून जेव्हां कलम ५, ६, ७ [2][किंवा ९] याअन्वयें एखाद्या इसमास दाखला दिलेल्या संस्थेंत अटकावून ठेवण्याबद्दल हुकूम झाला असेल, तेव्हां अटकावून ठेवण्याबद्दल हुकूम करणाऱ्या कोर्टानें अटकावून ठेवण्याबद्दलच्या हुकुमाची एक प्रत देऊन त्या इसमास तावडतोब अगदीं जवळच्या दाखल करून घेण्याच्या ठिकाणीं रवाना केलें पाहिजे. त्यानंतर त्या इसमास दाखल करून घेण्याचें ठिकाण स्वाधीन असलेल्या अंमलदाराच्या रखवालींत देण्यांत आलें पाहिजे आणि तेथून दाखला दिलेल्या संस्थेंत पाठविला जाईपर्यंत दाखल करून घेण्याचे ठिकाणीं त्यास अटकावून ठेवण्यांत आलें पाहिजे.

(२) जेव्हां कोणत्याहि अशा इसमास कैदेची शिक्षाहि झाली असेल, तेव्हां कैदेची शिक्षा देणाऱ्या कोर्टानें, ज्या तुरुंगांत अशा इसमास कैदेंत ठेवण्यांत यावयाचें असेल त्या तुरुंगाकडे एक वारंट पाठविलें पाहिजे आणि त्यास वारंट व अटकावून ठेवण्याच्या हुकुमाची प्रत यासह अशा तुरुंगांत रवाना केलें पाहिजे. कैदेच्या शिक्षेची पूर्णपणें अंमलबजावणी झाल्यानंतर, जर अशा इसमाची दाखला

---

१ सन १९५० चा ॲडॅप्टेशन ऑफ् लॉज् ऑर्डर याअन्वयें "प्रांतिक" ह्या शब्दाच्या बदला हा शब्द दाखल करण्यांत आला.

२ सन १९४७ चा मुंबईचा आक्ट ५३ वा याचें कलम २ (६) याअन्वयें "९ किंवा २३" हे आंकडे व शब्द यांच्या बदला हा शब्द व आंकडा दाखल करण्यांत आला.

दिलेल्या संस्थेंत अटकेंत राहण्याची मुदत शिल्लक राहिली असेल तर, सदरहू शिक्षेची अंमलबजावणी करणाऱ्या अंमलदारानें अटकावून ठेवण्याच्या हुकमाची प्रत बरोबर देऊन त्यास अगदीं जवळच्या दाखल करून घेण्याच्या ठिकाणीं पाठविलें पाहिजे. आणि त्यानंतर पोट-कलम (१) याचे ठराव शक्य असतील लागू करण्यांत येतील.

(३) कोणत्याहि इसमास दाखला दिलेल्या संस्थेंत अटकावून ठेवण्याची मुदत मोजतांना, या कलमाअन्वयें दाखल करून घेण्याचे ठिकाणीं ज्या मुदतीपर्यंत त्यास अटकावून ठेवण्यांत येईल ती मुदत हिशोबांत धरली पाहिजे.

महारोगी व वेडे इसम यांची वैद्यकीय तपासणी व त्यांस अटकावून ठेवणें.

२५. (१) कलम २४ अन्वयें एखाद्या इसमास दाखल करून घेण्याचे ठिकाणीं दाखल करून घेतल्यानंतर असें ठिकाण स्वाधीन असलेल्या अंमलदारानें [१][राज्य] सरकार सामान्य किंवा विशेष हुकूम करून फर्मावील अशा वैद्यकीय अंमलदाराकडून शक्य तितक्या लवकर त्याची तपासणी करून घेतली पाहिजे.

(२) वैद्यकीय अंमलदारानें दाखल करून घेण्याचें ठिकाण स्वाधीन असलेल्या अंमलदाराकडे आपला रिपोर्ट पाठवून त्यांत इतर गोष्टींबरोबर पुढील गोष्टी निर्दिष्ट केल्या पाहिजेत :—

(अ) सदरहू इसमाचें वय आणि पुरुष किंवा स्त्री तें ;

(ब) सदरहू इसम संसर्गजन्य महारोग झालेला महारोगी आहे किंवा कसें ;

(क) सदरहू इसम महारोगाखेरीज इतर एखादा संसर्गजन्य रोग झालेला असल्यास तो कोणता ;

(ड) सदरहू इसम मूर्ख अगर वेडसर आहे किंवा कसें ;

(इ) सदरहू इसमाचें सर्वसाधारण प्रकृतिमान व शरिराचा बांधा कसा आहे तें आणि जर तो कोणत्याहि प्रकारच्या कामास योग्य असेल तर तें कोणतें.

(३) भिकारी हा संसर्गजन्य महारोग जडलेला इसम किंवा वेडा आहे असें वैद्यकीय रिपोर्टांत नमूद करण्यांत आलें असेल तेव्हां दाखल करून घेण्याचें ठिकाण स्वाधीन असणाऱ्या अंमलदारानें सदरहू रिपोर्ट, ज्या कोर्टानें अटकावून ठेवण्याचा हुकूम दिला असेल त्या कोर्टाकडे तावडतोब पाठविला पाहिजे. त्यानंतर कोर्ट वैद्यकीय अंमलदाराची साक्षीदार म्हणून तपासणी करील व त्यानें दिलेला पुरावा लेखी नमूद करील. जर तपासणीनंतर आणि त्यास योग्य वाटेल अशी आणखी चौकशी केल्यानंतर कोर्टाचें असें मत होईल कीं, सदरहू भिकारी

---

१ सन १९५० चा ॲडॅप्टेशन ऑफ् लॉज् ऑर्डर या अन्वयें "प्रांतिक" ह्या शब्दाच्या बदला हा शब्द दाखल करण्यांत आला.

हा संसर्गजन्य महारोग जडलेला इसम किंवा वेडा इसम आहे, तर तशा अर्थाचा निर्णय कोर्टानें नमूद करून ठेविला पाहिजे आणि—

(१) जर तो संसर्गजन्य महारोग जडलेला इसम असेल तर सन १८९८ चा महारोग्यांबाबत आक्ट याच्या ३ ऱ्या कलमाअन्वयें नेमलेल्या व कलम ११, पोट-कलम (१) अन्वयें जिला दाखला दिलेली संस्था म्हणून दाखला देण्यांत आला आहे अशा महारोग्यांच्या आश्रयस्थानांत ;

(२) जर तो वेडा असेल तर सन १९१२ चा हिंदुस्थानचा वेडेपणाबाबत आक्ट याच्या कलम ८४ अन्वयें स्थापन केलेल्या अगर लैसेन्स दिलेल्या व कलम ११ चें पोट-कलम (१) अन्वयें जिला दाखला दिलेली संस्था म्हणून दाखला देण्यांत आलेला आहे अशा आश्रयस्थानांत ;

(३) जर तो संसर्गजन्य महारोग जडलेला इसम नसेल अगर वेडा नसेल तर दुसऱ्या कोणत्याहि दाखला दिलेल्या संस्थेंत अटकावून ठेवण्याविषयीं आधींच झालेल्या हुकुमानुसार भिकाऱ्यानें शिक्षा भोगली पाहिजे असें कोर्टानें फर्माविलें पाहिजे ;

(४) सन १८९८ चा महारोग्यांबाबत आक्ट अथवा सन १९१२ चा हिंदुस्थानचा वेडेपणाबाबत आक्ट यांमध्यें कोणताहि ठराव असला तरी, जर सन १८९८ चा महारोग्यांबाबत आक्ट याच्या ३ ऱ्या कलमाअन्वयें नेमलेलें कोणतेंहि महारोग्यांचें आश्रयस्थान किंवा सन १९१२ चा हिंदुस्थानचा वेडेपणाबाबत आक्ट याच्या कलम ८४ अन्वयें स्थापन केलेलें अथवा परवाना दिलेलें आश्रयस्थान यास कलम ११, पोट-कलम (१) याअन्वयें दाखला दिलेली संस्था म्हणून दाखला मिळालेला असेल तर, प्रसंगाप्रमाणें अशा महारोग्यांच्या आश्रयस्थानाचा सुपरिंटेंडेंट किंवा असें वेड्यांचें आश्रयस्थान स्वाधीन असलेला इसम यास या कलमाअन्वयें कोर्टाच्या फर्मानानुसार तेथें पाठविलेल्या इसमांस अटकावून ठेवण्याचाहि अधिकार असेल.

दाखल करून घेण्याचें ठिकाण किंवा दाखला मिळालेली संस्था यांतून पळून जाणाऱ्या इसमास अटक करणें.

२६. दाखल करून घेण्याचें ठिकाण स्वाधीन असलेल्या अंमलदाराच्या परवानगीशिवाय असें ठिकाण सोडून जाणाऱ्या कोणत्याहि इसमास किंवा दाखला दिलेली संस्था स्वाधीन असणाऱ्या सुपरिंटेंडेंटाच्या परवानगीशिवाय अशी संस्था सोडून जाणाऱ्या कोणत्याहि इसमास किंवा कलम २०, पोट-कलम (१) अन्वयें परवानगी दिलेली गैरहजर राहण्याची मुदत संपल्यानंतर परत न येणाऱ्या इसमास [१][वारंटाशिवाय धरण्याचा व प्रसंगाप्रमाणें, दाखल करून घेण्याच्या ठिकाणाकडे किंवा दाखला दिलेल्या संस्थेकडे परत पाठविण्याचा अधिकार पोलिस अंमलदारास

---

१ सन १९४७ चा मुंबईचा आक्ट ५३ वा याचें कलम २ (७) याअन्वयें हे शब्द दाखल करण्यांत आले.

किंवा [१][राज्य] सरकारनें याबाबत अधिकार दिलेल्या दाखल करून घेण्याच्या ठिकाणाच्या किंवा दाखला दिलेल्या संस्थेच्या अधिकाऱ्यास असेल.]

२७. [२][(१)] दाखला दिलेल्या संस्थेंत अटकावून ठेवलेल्या कोणत्याहि इसमास [३]* * * * हिंदुस्थानांतील ज्या कोणत्याहि इतर भागाच्या संबंधांत [३]* * * मुंबई [४][राज्यांतील] तजविजीप्रमाणें सदरहू भागाच्या [१][राज्य] सरकारनें [३]* * * * त्या भागांत [३]* * * अंमलांत असलेल्या कोणत्याहि कायद्याअन्वयें तजवीज केलेली असेल त्या भागांतील [३]* * * * तशाच प्रकारच्या कोणत्याहि संस्थेंत तेथून पाठविण्यांत यावें असें फर्माविण्याचा [१][राज्य] सरकारास अधिकार आहे :

दाखला दिलेल्या संस्था व हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांतील तशाच प्रकारची संस्था यांच्या दरम्यान इसमांची अदलाबदल.

मात्र असें ठरविण्यांत येत आहे कीं, या कलमाअन्वयें कोणत्याहि इतर [५][राज्यांत] [६]* * * * सदरहू इतर [७][राज्याच्या] [६]* * * सरकारच्या संमतीशिवाय पाठविण्यांत येतां कामा नये.

[८][(२) राज्य-सरकारास, कोणत्याहि दाखला दिलेल्या संस्थेच्या सुपरिंटेंडंटाचा सल्ला घेऊन, ज्याच्या संबंधांत भारताच्या इतर कोणत्याहि भागांतील लायक अधिकाऱ्याकडून दाखला दिलेल्या संस्थेंत किंवा तत्सम स्वरूपाच्या संस्थेंत त्यास अटकावून ठेवण्याबद्दल फर्माविणारा ह्या आक्टाअन्वयेंच्या हुकुमासारखा अटकावून ठेवण्याविषयीं हुकूम करण्यांत आला असेल त्या इसमाची त्या संस्थेंत बदली करण्यास संमति देण्याचा अधिकार आहे आणि अशा रीतीनें बदली करण्यांत आल्यानंतर ह्या आक्टाचे ठराव अशा इसमास लागू होतील.]

---

१ सन १९५० चा ॲडॅप्टेशन ऑफ् लॉज् ऑर्डर याअन्वयें "प्रांतिक" ह्या शब्दाच्या बदला हा शब्द दाखल करण्यांत आला.

२ सन १९५२ चा मुंबईचा आक्ट २१ वा याचें कलम ५ याअन्वयें कलम २७ यास पोट-कलम (१) असा नवीन नंबर देण्यांत आला.

३ सन १९५० च्या ॲडॅप्टेशन ऑफ् लॉज् ऑर्डर अन्वयें "ब्रिटिश" "किंवा ज्या कोणत्याहि हिंदी संस्थानाच्या संबंधांत", "किंवा सदरहू हिंदी संस्थानच्या सरकारनें" "किंवा संस्थानांत" व "किंवा संस्थानांतील" हे शब्द गाळण्यांत आले.

४ वरील ऑर्डर अन्वयेंच "प्रांतांतील" ह्या शब्दाच्या बदला "राज्यांतील" हा शब्द दाखल करण्यांत आला.

५ वरील ऑर्डर अन्वयेंच "प्रांतांत" ह्या शब्दाच्या बदला हा शब्द दाखल करण्यांत आला.

६ वरील ऑर्डर अन्वयेंच "किंवा हिंदी संस्थानांत" "किंवा हिंदी संस्थानाच्या" हे शब्द गाळण्यांत आले.

७ वरील ऑर्डर अन्वयेंच "प्रांताच्या" ह्या शब्दाच्या बदला हा शब्द दाखल करण्यांत आला.

८ सन १९५२ चा मुंबईचा आक्ट २१ वा याचें कलम ५ याअन्वयें हें पोट-कलम दाखल करण्यांत आलें.

बोटांचे ठसे घेण्याचा अधिकार.

२८. (१) या आक्टाअन्वयें कोणत्याहि दाखला दिलेल्या संस्थेंत अटकावून ठेवण्याबद्दल हुकूम करण्यांत आलेल्या प्रत्येक इसमानें कोणत्याहि वेळीं [1][ग्रेटर मुंबईंत] कमिशनर ऑफ् पोलीस यांस किंवा याबाबत त्यानें अधिकार दिलेल्या कोणत्याहि अंमलदारास आणि इतर ठिकाणीं डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट यांस किंवा याबाबत त्यानें अधिकार दिलेल्या कोणत्याहि अंमलदारास आपल्या बोटांचे ठसे घेऊं दिले पाहिजेत.

(२) जो कोणीहि इसम पोट-कलम (१) अन्वयें आपल्या बोटांचे ठसे घेऊं देण्यास नकार देईल तो, त्याजवर अपराधाच्या शाबितीचा ठराव झाल्यावर, दाखला दिलेल्या संस्थेंत त्यास अटकावून ठेवण्याची तीन महिन्यांहून जास्त नाहीं इतकी मुदत तितक्याच मुदतीच्या कैदेच्या शिक्षेंत रूपांतर केली जाण्यास पात्र होईल.

(३) पोट-कलम (२) अन्वयें दिलेली कैदेची शिक्षा ही, ज्या रीतीनें कलम ६ अन्वयें दिलेली शिक्षा अमलांत आणली जाते त्याच रीतीनें अंमलांत आणली जाईल.

भिक्षा मिळविण्यासाठीं किंवा काढण्यासाठीं उघडी केलेली किंवा दाखविलेली जनावरें धरणें व त्यांची विल्हेवाट लावणें.

[2][२८-अ. (१) भिक्षा मागतांना आढळून आलेल्या इसमास कलम ४ चें पोट-कलम (१) अन्वयें पकडणाऱ्या कोणत्याहि पोलिस अंमलदारास किंवा इतर इसमास, ज्या कोणत्याहि जनावराचें क्षत, जखम, दुखापत, अंगविकृति अथवा रोग भिक्षा मिळविण्याच्या किंवा काढण्याच्या उद्देशानें अशा इसमाकडून उघडा करण्यांत किंवा दाखविण्यांत आला होता त्या जनावरास धरण्याचा अधिकार आहे.

(२) सदरहू जनावर धरणाऱ्या पोलिस अंमलदारास किंवा इतर इसमास, अशा जनावराला सन १८९० चा जनावरांचा छळ करण्यास मनाई करण्याबाबत आक्ट याचें कलम ६-ब याअन्वयें नेमलेल्या जनावरांच्या दवाखान्यांत, त्यास कोर्टासमोर हजर करण्यांत येईपर्यंत तेथें अटकावून ठेवण्यासाठीं नेण्याचा अधिकार आहे.

(३) भिक्षा मागतांना आढळून आलेल्या इसमास ज्या कोर्टासमोर आणण्यांत आलें असेल त्या कोर्टास असें फर्माविण्याचा अधिकार आहे कीं, सदरहू जनावरास तें मुक्त करण्यास योग्य होईपर्यंत अशा जनावरांचा दवाखान्यांत औषधोपचार केले पाहिजेत व त्याची शुश्रूषा केली पाहिजे किंवा त्यास पांजरपोळांत पाठविलें पाहिजे किंवा जर, ज्या प्रदेशांत तें जनावर आढळून आलें असेल तो प्रदेश ताब्यांत असलेला पशुवैद्यकीय अंमलदार किंवा सन १८९० चा जनावरांचा छळ करण्यास मनाई करण्याबाबत आक्ट याच्या १९ व्या कलमाअन्वयें केलेल्या

---

१ सन १९४७ चा मुंबईचा आक्ट ५३ वा याचें कलम २(८) याअन्वयें "मुंबई शहरांत" ह्या शब्दांच्या बदला हे शब्द दाखल करण्यांत आले.

२ वरील आक्टाचें कलम २(९) याअन्वयें हें कलम दाखल करण्यांत आलें.

कानूंवरून अधिकार देण्यांत आला असेल असा इतर पशुवैद्यकीय अंमलदार तें बरें होण्यासारखें नाहीं किंवा छळ केल्यावांचून त्यास काढून लावतां येणार नाहीं, असा दाखला देईल तर त्याचा नाश केला पाहिजे; आणि कोर्टास असाहि हुकूम देण्याचा अधिकार आहे कीं, जनावरास जनावरांच्या दवाखान्यांतून मुक्त करण्यांत आल्यानंतर तें जप्त करण्याचा अधिकार आहे.

(४) जनावरांच्या दवाखान्यांत शुश्रूषेसाठीं किंवा औषधोपचारासाठीं पाठविण्यांत आलेल्या जनावरास, त्यास पांजरापोळांत पाठविलें पाहिजे किंवा त्याचा नाश केला पाहिजे असें कोर्ट फर्मावील तो प्रसंग खेरीज करून, ज्या प्रदेशांत तो जनावरांचा दवाखाना असेल तो प्रदेश ताब्यांत असलेल्या पशुवैद्यकीय अंमलदारानें किंवा सन १८९० चा जनावरांचा छळ करण्यास मनाई करण्याबाबत आक्ट याच्या १५ व्या कलमाअन्वयें केलेल्या कानूंवरून अधिकार देण्यांत आला असेल अशा इतर पशुवैद्यकीय अंमलदारानें त्याच्या मुक्ततेसाठीं दिलेल्या निरोगीपणाच्या दाखल्यावांचून अशा जागेतून मुक्त करतां कामा नये.]

२९. या आक्टाचीं कलमें ६ [1][व ९] यांखालीं येणारे अपराध कॉग्निझेबल व जामीन न घेण्याजोगे समजण्यांत येतील. *अपराध कॉग्नीझेबल व जामीन न घेण्याजोगें समजणें.*

३०. या आक्टाअन्वयें कोणतेहि काम करण्याचा अधिकार दिलेले सर्व इसम हिंदुस्थानचा अपराध्यांस शिक्षा करण्याविषयीं कायदा याच्या अर्थाप्रमाणें सरकारी नोकर म्हणून समजण्यांत येतील. *सरकारी नोकर म्हणून समजावयाचे इसम.*

३१. सन १८९८ चा फौजदारी काम चालविण्याच्या रितीविषयीं कायदा याची बाब ४२ हींतील ठराव, शक्य असेल तेथवर, या आक्टाअन्वयें घेतलेल्या मुचलक्यांस लागू असतील. *सन १८९८ चा आक्ट ५ वा याअन्वयें घेतलेले मुचलके.*

३२. सन १८९८ च्या फौजदारी काम चालविण्याच्या रितीविषयींच्या कायद्याअन्वयें अपिलाच्या व फेरतपसणीच्या कारणांसाठीं, या कायद्याअन्वयें अटकावून ठेवण्याबाबतच्या हुकुमाचा अर्थ (कलम ९ अन्वयेंचा अटकावून ठेवण्याबाबतचा हुकूम धरून) तितक्याच मुदतीच्या कैदेच्या शिक्षेबाबत हुकूम म्हणून लावण्यांत आला पाहिजे. *अपील.*

---

१ सन १९५२ चा मुंबईचा आक्ट २१ वा याचें कलम ६ याअन्वयें "९ व २३" हे आंकडे व शब्द यांच्या बदला हा शब्द व आंकडा दाखल करण्यांत आला.

कानू. **३३.** (१) [१][राज्य] सरकारास, सरकारी गॅझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून व आगाऊ प्रसिद्ध करण्याच्या शर्तीस पात्र राहून, या आक्टाचे हेतु पार पाडण्याकरितां कानू करण्याचा अधिकार आहे.

(२) विशेषेंकरून आणि वरील अधिकाराच्या सामान्यतेस बाध न येतां अशा कानूंत पुढीलपैकीं सर्व किंवा कोणत्याहि बाबतींबाबत ठराव करण्याचा अधिकार आहे:—

(अ) कलम २ ची रकम (१) मधील पोट-रकम (इ) (२) अन्वयेंच्या करणाबाबत अधिकार देण्याची रीत;

[२][(अअ) कलम ५, पोट-कलम (४) अन्वयें जन्म किंवा वसतिस्थान याबाबतची चवकशी ज्या रीतीस अनुसरून केली पाहिजे ती रीत;]

[३][(अ ब) दाखला दिलेल्या संस्थेंत अटकावून ठेवलेल्या इसमाच्या पोषणासाठीं कलम ६-अ, पोट-कलम (१) अन्वयें ज्या रीतीनें वर्गणी देण्याविषयीं फर्माविण्याचा अधिकार आहे ती रीत;]

(ब) कलम ४ चें पोट-कलम (३) किंवा कलम ७ यांअन्वयें धरलेल्या इसमांस ठेवण्याची रीत;

(क) कलम ९ चें पोट-कलम (१) अन्वयें संक्षिप्त चौकशीची रीत;

(ड) अॅडव्हायजरी कमिट्यांचें (सल्लागार कमिट्यांचें) कामकाज चालविणें;

(इ) कलम १२ अन्वयें व्हिजिटिंग कमिटी नेमण्याबाबतची रीत;

(फ) कलम १४ चें पोट-कलम (१) अन्वयें ज्या तारखेपूर्वी भरणा केला पाहिजे ती तारीख;

[४][(ग) कलम १६ मध्यें उल्लेख केलेली चीजवस्तू व पैसे व मौल्यवान वस्तू यांची विल्हेवाट लावण्याची रीत;]

(ह) या रकमेअन्वयें केलेल्या कोणत्याहि कानूच्या भंगाबद्दल अंगमेहनतीचें किंवा इतर काम लादणें व शिक्षा करणें या गोष्टी धरून दाखल करण्याचें ठिकाण किंवा दाखला दिलेली संस्था यांत अटकावून ठेविलेल्या इसमांची व्यवस्था व शिस्त;

---

१ सन १९५० चा अॅडॅप्टेशन ऑफ लॉज् ऑर्डर याअन्वयें "प्रांतिक" ह्या शब्दाच्या बदला हा शब्द दाखल करण्यांत आला.

२ ही रकम सन १९४७ चा मुंबईचा आक्ट ५३ वा याचें कलम २(१०) (अ) याअन्वयें दाखल करण्यांत आली.

३ सन १९५२ चा मुंबईचा आक्ट २१ वा याचें कलम ७ याअन्वयें रकम (अ ब) दाखल करण्यांत आली.

४ ही रकम सन १९४७ चा मुंबईचा आक्ट ५३ वा याचें कलम २(१०)(ब) याअन्वयें मूळ रकमेच्या बदला दाखल करण्यांत आली.

(आय्) कलम १९ अन्वयें ज्या शर्तीस पात्र राहून चीफ् इन्स्पेक्टरास पाठविण्याबाबत फर्मावण्याचा अधिकार आहे अशा शर्ती ;

(जे) ज्या शर्तीस पात्र ठेवून कोणाहि इसमास परवाना देऊन कलम २० अन्वयें सोडून देण्याचा अधिकार आहे त्या शर्ती ;

(के) ज्या शर्तीस पात्र राहून परवाना कलम २१ अन्वयें रद्द करण्याचा अधिकार आहे त्या शर्ती ;

(ल) भिकाऱ्यांच्या वैद्यकीय तपासणीबद्दलची रीत ;

(म) ठरविण्याची जरूरी असलेली अगर ठरविण्यांत येईल अशी कोणतीहि इतर बाबत.

३४. (१) ज्या तारखेस हा आक्ट [१][ग्रेटर मुंबईमध्यें] अंमलांत येईल त्या तारखेस सन १९०२ चा मुंबई शहर पोलिसांबाबत आक्ट यांत— रद्द करणें.

(१) कलम २७ चें पोट-कलम (२) यांत "कलम १२१ अन्वयें" या शब्दांच्या व आकड्यांच्या बदला पुढील मजकूर दाखल करण्यांत यावा :—

"सन १९४५ चा मुंबईचा भिकाऱ्यांबाबत आक्ट याचीं कलमें ६, ९ किंवा २३ याअन्वयें" ; आणि

(२) कलम १२१ हें रद्द करण्यांत येईल.

(२) [१][ग्रेटर मुंबईच्या] बाहेरील कोणत्याहि प्रदेशांत ज्या तारखेपासून हा आक्ट अंमलांत येईल त्या तारखेपासून सन १८९० चा मुंबईचा डिस्ट्रिक्ट पोलिसांबाबत आक्ट याचें कलम ६१ चें पोट-कलम (२) हें सदरहू प्रदेशापुरतें रद्द करण्यांत आलें आहे असें समजण्यांत येईल.

३५. या आक्टांतील कोणताहि मजकूर सन १८७४ चा युरोपियन भटक्यांबाबत आक्ट याच्या अर्थाप्रमाणेंच्या भटक्यांस लागू असणार नाहीं. बचाव.

(True translation)

J. H. DAVE,
Oriental Translator to Government.

---

१ सन १९४७ चा मुंबईचा आक्ट ५३ याचे कलम २ (११) याअन्वयें "मुंबई शहरांत" व "मुंबई शहराच्या" ह्या शब्दांच्या बदला अनुक्रमें "ग्रेटर मुंबईमध्यें" व "ग्रेटर मुंबईच्या" हे शब्द दाखल करण्यांत आले.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.

00002658